# आरोग्य सेवा संचालनालय
## (महाराष्ट्र राज्य)

" आरोग्य भवन ", सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, पी.डिमेलो रोड, मुंबई- ४०० ००१

| कार्यालय | दूरध्वनी | |
|---|---|---|
| संचालक (वैयक्तिक) | २२६२१०३१-३६ | Website http://arogya.maharashtra.gov.in |
| सहसंचालक (अर्थ व आस्थापना) | २२६२११८६ | Email : dhs_2005@rediffmail.com |
| मुख्य प्रशासकीय अधिकारी | २२६२१९७३ | Email : miscell@rediffmail.com |
| प्रशासकीय अधिकारी | २२६२६२०४ | Email : aodesk2adhs@gmail.com |

क्र.संआसे/कक्ष-२अ/टे.क्र.७/ बंधप. (विशे)./जा.क्र. 1136-37 /१९
दिनांक 20/5/१९

प्रति,
उपसंचालक, आरोग्य सेवा,
परिमंडळ नाशिक, कोल्हापुर

विषय :- महाराष्ट्र वैद्यकिय व आरोग्य सेवा गट-अ (वेतनश्रेणी रु.१५६०० -३९१०० ग्रेड पे-५४००) बंधपत्रित (विशे.) वैद्यकिय अधिकारी यापदावर नियुक्ती देणेबाबत.

संदर्भ :- १) संबंधित बंधपत्रित (विशेषज्ञ) उमेदवाराचे अर्ज
२) शा.नि.क्र.एमईडी-१००७/सीआर-४९०/०७/शिक्षण-२ दि.०८/०२/२००८
३) शासन निर्णय क्रमांक डब्ल्युपीएम १०११/प्र.क्र.३५२/११/शिक्षण-२ दि.०४/०४/२०१२

उपरोक्त प्रकरणी बंधपत्रित विशेषज्ञ या पदी नियुक्ती मिळणेबाबत संचालनालयास ०३ अर्ज प्राप्त झालेले आहेत. सदर उमेदवारांची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | उमेदवाराचे नाव | दुरध्वनी क्रमांक | महाविद्यालयाचे नाव | उत्तीर्ण वर्ष | शैक्षणिक अर्हता | नियुक्ती दयावयाचे मंडळ |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | डॉ. सरिता नामदेव वाघ | ९४२०३०८५३० | डॉ. शंकरराव चव्हाण वैद्यकीय महाविद्यालय, नांदेड | २०१८ | डी.ए. | नाशिक |
| २ | डॉ. नागेश लक्ष्मण शिंदे | ९४२३५३१०८४ | शासकिय वैदयकीय महाविदयालय, नागपुर | २०१८ | डी.जी.ओ. | कोल्हापुर |
| ३ | डॉ. स्वप्ना शिवाजी कदम | ९०७५७१७२७६ | शासकिय वैदयकीय महाविदयालय, मिरज जि. सांगली | २०१८ | डी.ए. | कोल्हापुर |

सदर उमेदवारास नियुक्ती देताना पदव्युत्तर पदवी/पदविका धारक उमेदवारांना शासन निर्णयातील मंजूर व स्पेशालिटीनुसार रुग्णालयांमध्ये नियुक्ती देण्यांत यावी. तसेच एमबीबीएस उमेदवारांना प्राथमिक आरोग्य केंद्र, या पदावर आपल्या स्तरावरुन प्राधान्याने आदिवासी भागातील आवश्यकतेनुसार जेथे पद रिक्त आहे अशा ठिकाणी प्रथम बंधपत्रित वैद्यकीय अधिकारी म्हणून पदस्थापना देण्यात यावी. तसेच आदिवासी भागात पदे रिक्त नसल्यास अस्थायी वैद्यकिय अधिकारी यांचे जागेवर पदस्थापना देण्यात यावी.

स्त्रीरोग, बालरोग, व भुलशास्त्र यातील पदवी/पदविका धारकांना प्रथम संदर्भ सेवा रुग्णालय, (FRU) येथेच नियुक्ती द्यावी. अशा रुग्णालयांची यादी अतिरिक्त संचालक, (कु.क.) यांचेकडुन प्राप्त करुन घ्यावी.

एम.डी. फार्माकॉलॉजी व एम.डी. मायक्रोबायोलॉजी अर्हताधारक उमेदवारांना शक्यतो जिल्हा रुग्णालयात तसेच एम.डी. फिजिओलॉजी अर्हताधारक उमेदवारांना एमबीबीएस अर्हताधारकाच्या ठिकाणी इतरत्र पदस्थापना देण्यात यावी. तसेच आपल्या स्तरावरुन दिल्या जाणा-या नियुक्ती आदेशात पुढील अटींचा समावेश करावा.

"सदर वैद्यकीय अधिका-यास नेमणुक दिलेल्या ठिकाणीच संपूर्ण बंधपत्र कालावधी अखंडीत पूर्ण करणे आवश्यक राहिल."

संदर्भिय क्र. ३ च्या शा.नि.मधील (ब) २ Xii वरील प्रक्रियेद्वारे नियुक्ती देण्यात आलेला उमेदवार त्याच्या नियुक्तीच्या ठिकाणी विहीत मुदतीत रुजू न झाल्यास वा सदर उमेदवाराने रुजू होऊन बंधपत्रित सेवा खंडीत केल्यास. सदर उमेदराने बंधपत्राचा भंग केला असे समजून योग्य ती पुढील कार्यवाही एकतर्फी करण्यात येईल. तथापि यास खालील प्रकरणी अपवाद करण्यात येईल.

I. जर एखाद्या महिला उमेदवाराची बंधपत्रित सेवा गर्भधारणेमुळे खंडीत झाली असेल तर अशा महिला उमेदवारास पुढील नियुक्ती प्रक्रियेत नियमित उमेदवाराप्रमाणेच नव्याने अर्ज सादर करावा लागेल व नियुक्ती मिळाल्यास सदर उमेदवाराने बंधपत्रित सेवेस नव्याने प्रारंभ केला असे समजण्यात येईल.

II. एखाद्या उमेदवाराची बंधपत्रित सेवेच्या व्याख्येत मोडणाऱ्या अन्य स्थायी सेवेत नियुक्ती झाल्यास सदर उमेदवाराची बंधपत्रित सेवा सदर उमेदवार उक्त स्थायी सेवेत रुजू झाल्यापासून नव्याने प्रारंभ झाली असे समजण्यात येईल.

संदर्भ क्र.२ च्या शासन निर्णय क्र.एमईडी-१००७/सीआर-४९०/०७/शिक्षण-२ दि.०८/०२/२००८ मधील परिच्छेद-२ (२) व ३ (२) येथील तरतुदीनुसार नियुक्ती दिलेला उमेदवार १५ दिवसांच्या आत नियुक्तीच्या ठिकाणी रुजू झाला नाही तर, सदर शासन निर्णयामधील परिच्छेद-२ (१) व ३ (१) येथे नमूद केल्याप्रमाणे दंड वसूल करण्याबाबत संचालक, वैद्यकीय शिक्षण संबंधित अधिष्ठातांमार्फत कारवाई करण्यात येईल.

त्याचप्रमाणे जे वैद्यकीय अधिकारी बंधपत्रित कालावधी पूर्ण करतील त्यांची नावे व जे वैद्यकीय अधिकारी बंधपत्र कालावधी अर्धवट सोडतील त्यांची नावे वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई व संचालनालयास न चुकता सादर करावी.

(डॉ. अनूप कुमार यादव)
आयुक्त, आरोग्य सेवा,
मुंबई